भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

आरबीआय/२०११-१२/३४
डीएनबीएस (पीडी-एमजीसी) सीसी.क्र.१०/२३.११.०१/२०११-१२

जुलै १,२०११

सर्व मॉडगेज गॅरंटी कंपन्यांचे अध्यक्ष/सीईओ

महोदय,

**जून ३०, २०११ पर्यंत अद्यावत केलेली अधिसूचना - "मॉडगेज गॅरंटी कंपनीज् इन्वेस्टमेंट (रिझर्व बँक) निदेश, २००८"**

आपणस माहितच आहे की, ह्या विषयावरील सर्व विद्यमान सूचना एकाच जागी मिळव्यात ह्यासाठी रिझर्व बँक अद्यावत परिपत्रके/अधिसूचना देत असते. जून ३०, २०११ रोजी अद्यावत केलेली अधिसूचना क्र. डीएनबीएस (एमजीसी)५/सीजीएम (पीके)-२००८ दि. फेब्रुवारी १५, २००८ मधील सूचना खाली दिल्या असून अद्यावत अधिसूचना आरबीआयच्या (http://www.rbi.org.in) ह्या वेबसाईटवरही टाकण्यात आली आहे.

आपली

(उमा सुब्रम्हण्यम)

प्रभारी मुख्य महाव्यवस्थापक

**भारतीय रिझर्व बँक**
**अबँकीय पर्यवेक्षण विभाग**
**केंद्रीय कार्यालय**
**केंद्र - १, वर्ल्ड ट्रेड सेंटर कफ परेड**
**कुलाबा - मुंबई ४०००05**

**अधिसूचना क्र. डीएनबीएस (पीडी)एमजीसी क्र.५/सीजीएम (पीके)-२००८ दि. फेब्रुवारी १५, २००८**

सार्वजनिक हिताच्या दृष्टीने योग्य वाटल्याने, व ह्या देशाच्या हितासाठी कर्ज प्रणालीचे विनियमन करण्यास ह्या बँकेला सहाय्य होण्यासाठी, खाली दिलेल्या प्रुडेंशियल नॉर्म्ससंबंधीचे निदेश देणे आवश्यक वाटल्याने, रिझर्व बँक अधिनियम १९३४ (१९३४ चा चार) च्या कलम ४५ जेएने दिलेल्या आणि ह्याबाबत दिलेल्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, प्रत्येक मॉडगेज गॅरंटी कंपनीला खाली दिलेले निदेश देत आहे.

**<u>लघु शीर्षक,सुरुवात आणि निदेश लागु होणे</u>**

**१.** (१) ह्या निदेशांना “मॉडगेज गॅरंटी कंपन्या इन्वेस्टमेंट (रिझर्व बँक) निदेश, २००८” असे म्हटले जाईल.
२) हे निदेश ताबडतोब जारी होतील
३) रिझर्व बँकेने पंजीकरण प्रमाणपत्र दिलेल्या प्रत्येक मॉडगेज गॅरंटी कंपनीला ह्या निदेशातील तरतुदी लागु होतील.

**<u>व्याख्या</u>**
**२.** (१) अन्य संदर्भ नसल्यास ह्या निदेशांसाठी :-

(१) “ब्रेक अप व्हॅल्यु” म्हणजे, इक्विटी भांडवल व राखीव भांडवल निधी वजा, अमूर्त ॲसेट्स व रिव्हेल्युएशन रिझर्व्ज, भागिले निवेशक कंपनीच्या इक्विटी शेअर्सची संख्या

२) “कॅरियिंग कॉस्ट”, म्हणजे, ॲसेट्स व त्यावर उपवर्जित झालेल्या परंतु न मिळालेल्या व्याजाचे पुस्तकी मूल्य

३) “अर्निंग व्हॅल्यु” म्हणजे, मागील तीन वर्षासाठी, कर वजा करुन आलेल्या नफ्याचे सरासरी मूल्य, वजा प्रिफरन्स डिव्हिडंड (एक्सट्रॉ ऑर्डिनरी व सारखे न येणाऱ्या बाबीची तडजोड करुन), भागिले निवेशक कंपनीच्या इक्विटी शेअर्सची (पुढील दराने भांडवलीकृत केलेल्या) संख्या.
अ) मुख्यत्वे करुन उत्पादक असलेल्या कंपन्यांसाठी आठ टक्के
ब) मुख्यत्वे करुन ट्रेडिंग करणाऱ्या कंपन्यांसाठी दहा टक्के
क) अबँकीय वित्तीय कंपनीसह अन्य कोणत्याही कंपनीसाठी बारा टक्के.

**टीप :** निवेशक कंपनी ही तोट्यातील कंपनी असल्यास अर्निंग व्हॅल्यु शून्य धरण्यात येईल.

४) “फेअर व्हॅल्यु” म्हणजे, ब्रेक अप व्हॅल्यु व अर्निंग व्हॅल्युचे मध्यम मान

५) “मॉडगेज गॅरंटी कंपनी” म्हणजे, मॉडगेज गॅरंटी कंपन्या प्रुडेंशियल नॉर्म्स (रिझर्व बँक) निदेश, २००८ मध्ये एक मॉडगेज गॅरंटी कंपनी अशी व्याख्या केली गेलेली आणि ह्या बँकेकडे पंजीकरण केलेली कंपनी.

६) नेट ॲसेट व्हॅल्यु” म्हणजे, एखाद्या विशिष्ट योजनेमध्ये, संबंधित म्युच्युअल फंडाने घोषित केलेली अगदी अलिकडील नेट ॲसेट व्हॅल्यु.

७) मॉडगेज गॅरंटी कंपन्यांनी केलेल्या गुंतवणुकीवरील इनकम रेकग्निशनसाठी “नॉन परफॉर्मिंग ॲसेट” (एनपीए) म्हणजे, जिच्या बाबतीत, व्याज किंवा मुद्दल किंवा कर्जफेडीची दायित्वे ९० दिवस किंवा त्यापेक्षा अधिक काळासाठी थकलेली आहेत असे ॲसेट्स.

(२) येथे वापरलेल्या परंतु व्याख्या न केलेल्या परंतु रिझर्व बँक अधिनियम १९३४(१९३४ चा २) मध्ये किंवा प्रुडेंशियल नॉर्म्स (एमजीसी) क्र. डीएनबीएस (पीडी)एमजीसी ४/सीजीएम (पीके) -२००८ दि फेब्रुवारी १५, २००८ मध्ये दिलेल्या, मॉडगेज गॅरंटी कंपनी प्रुडेंशियल नॉर्म्स (रिझर्व बँक) मार्गदर्शक तत्वे २००८ ह्यामध्ये व्याख़्या केलेल्या शब्दांचा व शब्दसमूहांचा अर्थ, तो अधिनियम किंवा ते निदेश ह्यात दिल्याप्रमाणेच असेल. हा अधिनियम किंवा निदेश ह्यात व्याख्या न केलेल्या शब्दांचा किंवा शब्दसमूहांचा अर्थ, कंपनीज अधिनियम १९५६ (१९५६ चा १) मध्ये त्यांना दिलेल्या अर्थाप्रमाणेच असेल.

**<u>मॉडगेज गॅरंटी कंपन्यांसाठी गुंतवणुक धोरण</u>**

**३.** (१) एखादी मॉडगेज गॅरंटी कंपनी केवळ पुढील संलेखातच गुंतवणुक करेलः-
अ) सरकारी प्रतिभूती
ब) कॉर्पोरेट संस्थांचा प्रतिभूती/सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांच्या व सरकारने हमी दिलेल्या प्रतिभूती
क) अनुसूचित वाणिज्य बँका/पीएफ ह्यांचे बाँड्स/स्थिर ठेवी/ठेवींच्या पावत्या
ड) कॉर्पोरेट संस्थांचे नोंदणीकृत व रेटेड डिबेंचर्स/बाँड्स
ई) संपूर्णपणे डेट ओरिएंटेड म्युच्युअल फंडांचे युनिट्स
फ) अनकोटेड सरकारी सिक्युरिटीज आणि सरकारी हमी असलेले बाँड्स.

(२) सबसिडिअरिज व संयुक्त उद्योग ह्यासह अन्य कोणतीही गुंतवणुक करण्यास परवानगी दिली जाणार नाही. तथापि एखादी मॉडगेज गॅरंटी कंपनी, कोणत्याही कंपनीच्या कोटेड किंवा अनकोटेड इक्विटी शेअर्समध्ये किंवा तिची कर्जफेड होण्यासाठी इतर अनकोटेड गुंतवणुकींमध्ये गुंतवणुक करु शकते. मात्र अशी कर्जे त्या मॉडगेज गॅरंटी कंपनीने तिच्या प्राप्तीनंतर तीन वर्षांच्या आत किंवा बँकेने वाढवून दिलेल्या कालावधीत फेडली जावीत.

**गुंतवणुकीचा साचा**

**४.** (१) एखादी मॉडगेज गॅरंटी कंपनी तिच्या एकूण गुंतवणुक पोर्टफोलिओच्या २५ % पेक्षा कमी नसलेली रक्कम केंद्र व राज्य सरकारच्या सिक्युरिटीजमध्ये गुंतवील.
(२)उरलेल्या गुंतवणुकी संचालक मंडळाला योग्य वाटतील त्याप्रमाणे परंतु कोणत्याही एखाद्या वर्गामधील उदा. लिस्टेड व रेटेड असलेले कॉर्पोरेट बाँड्स व डिबेंचर्स किंवा डेट ओरिएंटेड म्युच्युअल फंडांचे युनिट्स इत्यादींमध्ये २५ % मर्यादेच्या आत केल्या जाव्यात.
(३) ह्या निदेशांच्या परिच्छेद ३(१) मध्ये विहित केलेल्या संलेखांच्या प्रत्येक वर्गात वैय्यक्तिक गुंतवणुकींसाठी संचालक मंडळ उप-मर्यादा ठेवू शकते.
(४) एमजीसींद्वारे बाँड्स/डिबेंचर्स व डेट ओरिएंतेड म्युच्युअल फंडांमध्ये गुंतवणुक करण्यासाठी, सेबीकडे पंजीकृत झालेल्या रेटिंग एजन्सींनी दिलेले किमान इन्व्हेस्टमेंट ग्रेड रेटिंग (एमआयजीआर) असणे आवश्यक आहे.

**इन्कम रेकग्निशन (उत्पन्न-ओळाख)**

**५.** (१) जेथे केंद्र सरकार किंवा राज्य सरकारद्वारे व्याजप्रदान व मुद्दलाची परतफेड ह्यांची हमी दिली गेली आहे तसेच व्याज नियमितपणे दिले जात असून थकित झालेले/होणार नाही अशा कॉर्पोरेट संस्था/सार्वजनिक क्षेत्रातील संस्थांच्या सिक्युरिटीजवर, मॉडगेज गॅरंटी कंपन्या, उपवर्जित धर्तीवर उत्पन्न हिशेबात घेऊ शकतात.
(२) जेथे कॉर्पोरेट संस्थेने तिच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत शेअर्सवरील डिव्हिडंड घोषित केला असून प्रदान मिळविण्याबाबत शेअरधारकाचा हक्क सिध्द झाला आहे अशा कॉर्पोरेट संस्थेच्या डिव्हिडंड शेअर्सचे उत्पन्न, मॉडगेज गॅरंटी कंपन्या, उपवर्जित धर्तीवर हिशेबात घेऊ शकतात.
(३) जेथे संलेखांवरील व्याजदर पूर्व-निश्चित केलेले असून व्याज नियमितपणे दिले जात असून थकित नाही अशा सरकारी सिक्युरिटीज व कॉर्पोरेट संस्थांच्या बाँड्स व डिबेंचर्सवरील उत्पादन्न, मॉडगेज गॅरंटी संस्था उपवर्जित धर्तीवर हिशेबात घेऊ शकतात.
(४) मॉडगेज गॅरंटी कंपन्यांनी म्युअल फंडांच्या युनिट्सपासून येणारे उत्पन्न रोकड धर्तीवर हिशेबात घ्यावे.

**गुंतवणुकींचे लेखा-जोखा(अकाउंटिंग)**

**६.** (१) सर्व गुंतवणुकी मार्केट-टु-मार्केट असतील;
मूल्यांकनासाठी कोटेड गुंतवणुकींचे पुढील वर्गांमध्ये गट पाडले जातील, जसे ,
अ) ट्रेझरी बिल्ससह सरकारी सिक्युरिटीज
ब) सरकारी हमी असलेले बॉंड्स/सिक्युरिटीज
क) बॅंका/वित्तसंस्थांचे बॉंड्स
ड) कॉर्पोरेट संस्थांचे बॉंड्स/डिबेंचर्स आणि
ई) म्युच्युअल फंडाचे युनिट्स.

प्रत्येक वर्गासाठी कोटेड संलेखांचे मूल्यांकन प्रत्यक्ष मूल्यावर किंवा बाजार मूल्यावर (ह्यापैकी कमी असेल ते) केले जाईल. ह्यासाठी, प्रत्येक वर्गातील गुंतवणुकींचा विचार स्क्रिप-निहाय केला जाईल आणि प्रत्येक वर्गातील सर्व गुंतवणुकीची किंमत व बाजारमूल्य एकत्रित केले जाईल. एखाद्या वर्गासाठी एकूण बाजार मूल्य त्या वर्गासाठीच्या एकूण किंमतीपेक्षा कमी असल्यास, नफा-तोटा लेखामध्ये नक्त मूल्य ऱ्हासा साठी (नेट डिप्रिशिएशन) तरतुद केली जाईल किंवा आकारले जाईल. त्या वर्गासाठी असलेले एकूण बाजार मूल्य, त्या वर्गासाठीच्या एकूण किंमतीपेक्षा अधिक असल्यास नेट ॲप्रिशिएशन दुर्लक्षित केले जाईल. एका वर्गाच्या गुंतवणुकीमधील मूल्य ऱ्हासाची दुसऱ्या वर्गातील नफ्याबरोबर तडजोड केली जाणार नाही.

(२) अनकोटेड सरकारी सिक्युरिटीज किंवा सरकारी हमी असलेले बॉंड्सचे मूल्यांकन प्रत्यक्ष (कॅरियिंग) किंमतीवर केले जाईल.
(३) कर्जाच्या परतफेडीपोटी मिळविलेल्या अनकोटेड गुंतवणुकींचे मूल्यांकन पुढीलप्रमाणे केले जाईल;
अ) म्युच्युअल फंडांमधील अनकोटेड गुंतवणुकीचे मूल्यांकन, म्युच्युअल फंडाने, त्या विशिष्ट योजने बाबत घोषित केलेल्या नेट ॲसेट मूल्यानुसार केले जाईल
ब) अनकोटेड इक्विटी शेअर्सचे मूल्यांकन कॉस्ट किंवा ब्रेकअप व्हॅल्युनुसार (ह्यापैकी कमी असेल ते) केले जाईल.

**सूचना :-** इनकम रेकगनिशन आणि ॲसेट वर्गीकरणासाठी, अनकोटेड डिबेंचर्स, अशा डिबेंचर्शच्या मुदतीवर अवलंबून, मुदत कर्जे किंवा कर्ज सुविधा समजल्या जातील.

**७.** एमजीसीने तिच्या संचालक मंडळाच्या जुरीने ह्या निदेशांना अनुसरुन गुंतवणुक धोरण तयार करावे.

(पी. कृष्णमूर्ती)
प्रभारी मुख्य महाव्यवस्थापक